तरुण भारत

◀ गुरूवार दि. १६ जुलै २००९ ▶

# 'झोपडपट्टी पुनर्वसन योजना' सल्लागारपदी 'शेल्टर'

▶ सांगली / प्रतिनिधी

केंद्राच्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या महापालिकेच्या ९५ कोटीच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी सल्लागार म्हणून 'शेल्टर' या संस्थेच्यावतीने सर्वसामान्य कुटुंबासाठी शंभर रूपये मासिक हप्त्याने धूरविरहीत चुलीचे वितरण करण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेच्या सहाय्यक कार्यकारी संचालिक एस.एस. श्रीखंडे यांनी दिली.

१९९३ मध्ये पुण्यात स्थापन झालेली 'शेल्टर' ही स्वयंसेवी संस्था सांगलीसह विविध शहरात झोपडपट्टी पुनर्वसन, शौचालय प्रकल्प यात कार्यरत आहे. सांगलीमध्ये या संस्थेने बारा वस्त्यांमध्ये उभारलेल्या सार्वजनिक शौचालयांचा साडेतीन हजार लोकांना लाभ झाला.

सांगलीमध्ये झोपडपट्टी पुनर्वसनासाठी संस्थेने सुरू केलेल्या सर्वेक्षणात अनेक लोक मातीच्या चुली वापरत असल्याचे आढळून आले. या लोकांना ६०० रूपये किंमतीची धूरविरहीत चूल मासिक १०० रूपये हप्त्याने उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या चुलीमुळे धूर होत नाही. त्यामुळे ती आरोगच्यादृष्टीने चांगली आहे. कमीत कमी सरपणामध्ये ती जास्त ऊर्जा देते. या चुलीचे धोत्रे आबा झोपडपट्टीत वितरण करण्यात येणार आहे. संस्थेच्यावतीने प्लॅस्टिक पिशव्यांना पर्याय म्हणून जुन्या साड्यापासून कापडी पिशव्या तयार करण्याचा उद्योगही महिलांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे.